महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
दूरध्वनी क्र. २६४७४२११
फॅक्स क्र. २६४७५८१४
माहिती व जनसंपर्क विभाग
प्रकाशगड, बांद्रा (पूर्व),
मुंबई-४०० ०५१.

क्र. मुमव्य(सां.सं.)/तक्रार खुलासा/३७४८९ दिनांक : १३ डिसेंबर २०१०

# : परिपत्रक :

**विषय : महावितरणच्या कामकाजावर वृत्तपत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या / टिकाटिप्पणीवर खुलासा करण्याबाबत.**

वर्तमानपत्रातून महावितरण व महावितरणच्या विविध विभागासंबंधात बातम्या व टिकात्मक मजकूर प्रसिध्द होत असतो. अनेकदा हा मजकूर वस्तुस्थितीला धरुन नसतो व अपुऱ्या माहितीवर आधारित असतो. त्यामुळे महावितरणच्या भूमिकेबद्दल जनमानसात गैरसमज होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेता, अशा बातम्यांचा खुलासा तातडीने त्या त्या विभागाद्वारे त्वरीत करणे आवश्यक आहे.

सध्याच्या कार्यपध्दतीनुसार त्या त्या विभागाशी संबंधित वृत्तपत्रांची कात्रणे जनसंपर्क विभागामार्फत संबंधित विभागांना पाठविली जातात व त्या कात्रणांवर खुलासा करण्याचे काम संबंधित विभागाकडून व्हावे अशी अपेक्षा असते. मात्र अनेकवेळा अशा प्रकारचा खुलासा तात्काळ केला जात नाही, असे निदर्शनास आले आहे.

तात्काळ खुलासा न केल्यास परिणामकारकता संपून जाते आणि वर्तमानपत्रात अशा खुलाशास फारसे महत्त्व राहत नाही. म्हणून ज्या दिवशी अशा प्रकारची बातमी प्रकाशित केली जाते, त्याच दिवशी त्या बातमीचा खुलासा तातडीने होणे क्रमप्राप्त आहे.

यादृष्टीने महावितरणमधील सर्व परिमंडल प्रमुख यांना सूचित करण्यात करण्यात येते की, त्यांनी आपल्या अखत्यारितील सर्व अधीक्षक अभियंते व सर्व कार्यकारी अभियंते यांना याबाबत यथायोग्य सूचना द्याव्यात. सर्व विभाग प्रमुख आणि मंडल प्रमुख यांनी तक्रारींची कात्रणे संबंधित जनसंपर्क अधिकाऱ्यांकडून येण्याची वाट न पाहता आपल्या कार्यालयातच तशी व्यवस्था करून

तक्रारींवर खुलासा पाठविण्याची शिघ्र कार्यवाही करावी. या संदर्भात राज्यशासनाने नव्याने काही सूचना प्रसारित केलेल्या आहेत. त्यानुसार हे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

हे परिपत्रक महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

**(शरद दाभाडे)**
संचालक (संचालन)

प्रति,

१. सर्व प्रादेशिक कार्यकारी संचालक.
२. सर्व क्षेत्रीय मुख्य अभियंते.
३. सर्व उपमुख्य जनसंपर्क अधिकारी / जनसंपर्क अधिकारी.